# भारतीय प्रशासनातील ई – शासन

**Pallavi Malakari Kambale** PhD student (history) Punyshlok ahilyadevi Holkar Solapur university
email pallavikambale1990@gmail. com Mo 8263972283

---

**प्रस्तावना** :आपल्या महाराष्ट्र राज्यातील सिंधुदुर्ग हा जिल्हा पहिला ई-ऑफिस झालेला जिल्हा ठरला आहे . सध्याचे युग माहिती तंत्रज्ञानचे युग म्हणून ओळखले जाते त्यामुळे कोणत्या ही क्षेत्रात जर यशस्वी होण्यासाठी त्या क्षेत्रातील योग्य अचूक माहिती जलदगतीने मिळणे हे फार महत्वाचे असते आणि हे फक्त माहिती संप्रेषण तंत्राज्ञानच्या उपलब्धतेमुळे शक्य झाले .२० व्या शतकापेक्षा २१ व्या शतकात माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात झालेल्या क्रांतीमुळे मानवी जीवनात आमूलाग्र बदल घडून आले ई-क्रांती ही समाजाजीवनाचा एक अविभाज्य भाग बनून प्रशासन व्यवस्थेला समजाभिमुख बनवण्यात मोलाची भूमिका बजावत आहे . याच तंत्रज्ञानाच्या वापरणे शासन व्यवस्थेतील सर्व व्यवहार कमी वेळेत आणि पारदर्शक रित्या पार पाडले जावू शकतात त्यामुळे ई-प्रशासनाला महत्व प्राप्त होऊ लागले आहे . याच्या वापराने शासन दरबारातील दिरंगाई दूर होण्यास मदत मिळते सगळे व्यवहार सुलभरित्या होऊ शकतात . सरकारच्या सोयी-सुविधा पुरवण्यासाठी ,राज्य कारभार कार्यक्षम रित्या करण्यासाठी ,जनतेला महत्वाच्या सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी ,दैनंदिन कामे पूर्ण करण्यासाठी शासनाच्या कार्यक्षमतेचा पुरेपूर वापर करून घेण्यासाठी संदेशवहन तंत्रज्ञानाचा वापर करून सार्वजनिक क्षेत्रातील अंतर्गत आणि बहिरगत बदल घडवून आणणे म्हणजेच ई-प्रशासन होय.

ई-लोकशाही या शब्दाचा वापर स्टीव्हन क्लीट याने केला २१ व्या शतकात आयटीसी साधनाचा वापर करून शासन व्यवस्थेतील व्यवहार सुलभ करण्याच्या दृष्टिने या संज्ञानेला चालना दिली गेली याच्या वापरामुळे देशाचे कायदे प्रस्ताव ,विकास आणि निर्मिती मध्ये जास्तीत जास्त लोकांचा सहभाग सुलभ झाला आहे या प्रशासनाच्या माध्यमातून डिजिटल साधनाचा उपयोग करून नागरिकांशी संवाद साधने सुकर झाले .

माहिती संप्रेषण तंत्रज्ञान क्षेत्राने प्रशासन व्यवस्थेला एका नव्या उंचीवर पोहचवण्याचे काम केले आहे. जगभरातील अनेक देश ई-प्रशासनाकडे वळले आहेत मागील अनेक दशकातील प्रशासनाच्या प्रत्येक व्यवहारात गुंतागुंत आणि विविधता यांनी भरलेले आहे सामान्य जनतेच्या शासनाकडून असलेल्या अपेक्षा खूप वाढल्या आहेत . माहिती आणि संप्रेषण क्षेत्रातील क्रांतीमुळे माहितीचे महाजाल सगळ्यांसाठी खुले झाले आहे त्यामुळे माहिती साठवणे ,त्यावर प्रक्रिया करणे ,त्याचे प्रसरण करणे ,त्या माहिती मध्ये बदल करणे ,ती माहिती एका ठिकाण हुन दुसरीकडे पाठवणे शक्य झाले यामुळे वेगवान पद्धतीने प्रक्रिया करून यातून शासनाच्या कार्यपद्धतीला वेग येईल कोणता ही निर्णय त्वरेन आणि न्यायपूर्ण पद्धतीने देणे सुलभ झाले त्यामुळे शासनाच्या व्यवहारात पारदर्शकता निर्माण होऊन जनतेप्रती जबाबदारी वाढण्यास मदत होईल

आपल्या देशाचा आकार त्याची भौगोलिक रचना आणि अवाढव्य लोकसंख्येच्या दृष्टीने शासनाची व्याप्ती वाढवण्यासाठी ई-प्रशासन खूप महत्वपूर्ण भूमिका पार पाडू शकते त्यामुळे राज्यशासन आणि केंद्रशासन पुढाकार घेवून या शासन पद्धतीला आपलेसे करण्याच्या दृष्टीने सकारात्मक पावले उचलत आहेत सार्वजनिक सेवा सुधारण्यात आणि त्या सुलभ रित्या मिळवण्यात सुलभता यावी यासाठी सर्व स्तरातून प्रयत्न सुरू आहेत याची सुरुवात शासकीय सेवा संगणकीकृत करण्यापासून झाली यापासून नागरिकांना केंद्रस्थानी ठेवून त्यांना तत्पर सेवा देणे आणि ती देताना त्यात पारदर्शकता आणणे हा प्रमुख हेतु समोर ठेवला जातो भारत सरकारच्या राष्ट्रीय ई-प्रशासन योजनेचे उद्दिष्ट सार्वजनिक सेवा नागरिकांच्या जवळ घेवून जाणे त्यासाठी देशभर पायाभूत सुविधा निर्माण करणे हे प्रधान कार्य असेल

भारतातील ई-प्रशासन :भारतामध्ये या संकल्पनेची सुरुवात अगदी आता झाली असे म्हणावे लागेल ज्यावेळी १९८७ ला नॅशनल सॅट लाईट बेस्ट कम्प्युटर नेटवर्क लाँच झाले आणि नॅशनल इन्फॉर्मेटिक्स सेंटर प्रोग्राम द्वारे डिस्ट्रिक इन्फॉर्मेशन नेटवर्क लॉच झाल्यावर देशभरातील सर्व जिल्हे संगणकीकृत करण्यात आले ज्याद्वारे मोफत हार्डवेअर आणि सॉफ्टवेअर प्रदान करण्यात आले देशातील सर्व जिल्ह्यात ई प्रशासन सुरू करण्यात आले ज्याचा उद्देश सर्व सरकारी सेवा सामान्य लोकांपर्यंत पोहचवण्याची कार्यक्षमता वाढवण्यात आली विविध उपक्रम याद्वारे राबवले गेले .

**डिजिटल सेवा**

डिजिटल क्षेत्रात देशाला सक्षम करण्यासाठी डिजिटल इंडिया २०१५ मध्ये सुरू करण्यात आला याचा उद्देश सुरक्षित आणि स्थिर अशा डिजिटल पायाभूत सुविधा विकसित करणे ,सरकारी सेवा डिजिटल पद्धतीने पुरवणे ,सार्वत्रिक डिजिटल साक्षरता प्राप्त करणे मोबाइल द्वारे सरकारी सेवा उपलब्ध करून देण्यासाठी एम ॲप स्टोअर मध्ये विविध लाईव् ॲपलीकेशन आहेत जे सरकारी सेवा देतात

Uidai द्वारे एक आधार क्रमांक दिला जातो हे ओळख आणि पत्ता याचा पुरावा म्हणून काम करते याच्यात बायोमॅट्रिक करून डोळे आणि हाताच्या ठशाने ओळख निश्चित केली जाते. MyGov. in हे नगरिकानांच्या सहभागाचे व्यासपीठ आहे नागरिक राष्ट्राची धोरणे व योजनावर चर्चा करू शकतात UMANGया च्या द्वारे कर्मचारी निर्वाह निधी, डिजिटल लॉकर इ मध्ये केंद्र आणि राज्य सरकारी सेवामध्ये प्रवेश करता येतो DIJIलॉकर याच्या मध्ये महत्वाचे दस्तऐवज संग्रहित केले जावू शकतात

Pay Gov याच्या सहाय्याने सार्वजनिक आणि खाजगी बँकांना पेमेंट करण्यास मदत करते

यासारख्या एक नाही तर किती तर सेवा मोबाइल फोनच्या एका क्लिक वर उपलब्ध झाल्या आहेत .

**ई प्रशासनाची उद्दिष्टये :**

१ सरकार ,नागरिक आणि व्यवसायासाठी प्रशासन सुलभ करणे .

२ सरकारी कारभार अधिक पारदर्शक आणि उतरदायी बनवणे .

३ अधिक कार्यक्षम सेवा देवून नागरिकांनाच्या गरजा पूर्ण करणे .

४ प्रशासनातील कामे जलद आणि कार्यक्षम रित्या पार पाडणे .

४ नागरिकांच्या समस्यांच्या जलद निवरण्या साठी डिजिटल संप्रेषण तंत्राचा वापर करणे .

ई-प्रशासनाची कमान सहा उद्देशावर खंबीर पणे उभी आहे :ई-प्रशासनाला बळकटी देण्यासाठी आणि त्याची अंमलबजावणी सक्रिय आणि प्रतिकात्मक करण्यासाठी पुढील सहा स्तंभ निर्माण केले आहेत

१ **कायद्याची चौकट निश्चित करणे** :परिवर्तन हा सृष्टीचा नियम असल्यामुळे काळानुसार कालबाह्य झालेल्या गोष्टी सोडून देवून त्यात सुधारण स्वीकारल्या पाहिजे नवीन तंत्रज्ञानाचा वापर करून कायद्याची चौकट निश्चित करण्यास सुरुवात झाली आहे

२ **क्षमतांची बांधणी करणे** :कार्यालयीन कामकाज दिवसेंदिवस वाढत चालले आहे त्यामुळे ते अटोक्यात आणण्यासाठी तंत्रज्ञानाची मदत घेवून त्याच्या कर्मचाऱ्यांच्या कामाची गती वाढवण्याची क्षमता निर्माण करणे

३ **वित्त पुरवठा** :कोणत्या ही योजनेची आंमलबाजवणी होण्यासाठी आर्थिक पाठबळ आवश्यक असते त्याचा उपलब्धतेवर वर योजनेची यश अपयश अवलंबून असते त्यामुळे वित्त पुरवठे नियमित उपलब्ध होईल याची व्यवस्था करणे गरजेचे आहे

४ **संस्थात्मक चौकट निर्माण करणे** :ई प्रशासनाची योजना निर्माण करून तिच्या योग्य निर्देशना साठी कार्यक्षम प्रशासन निर्माण करणे त्यासाठी कायद्याच्या अमलबजावणी करण्याची मर्यादा निश्चित केली आहे

५ **ई प्रशासनाच्या पायाभूत एकत्रित सुविधा निर्माण करणे** :ई प्रशासनासाठी डेटा सेंटर ,समान सेवा ,देशव्यापी नेटवर्क सेवा निर्माण करणे सामान्य जनता आणि त्याच्या शी निगडीत सेवा उपक्रम आणि एकाच ठिकाणी त्याच्या समस्यांचे निवारण करणे या सगळया गोष्टींचा योग्य समन्वय साधण्यासाठी सेवा सुविधा उपलब्ध करून देणे

६ **समान राज्यव्यापी** :शासनाच्या विविध विभागासाठी ई टेंडर एसएमएस गेटवे ,पेमेंट गेटवे निर्माण करणे इ सेवा निर्माण करून त्याच्यात योग्य समन्वय निर्माण करणे

प्रचलित माहिती तंत्रज्ञानाच अधिकाधीक वापर करून प्रशासन अधिक कार्यक्षम ,गतिमान व पारदर्शी करणे हा ई-प्रशासनाचा आत्मा आहे या तंत्रा मुळे मानवाचे जीवन समृद्ध होत चालले आहे भारत हा जागतिक इंटरनेट कार्यक्षेत्राचा एक महत्वपूर्ण घटक बनला आहे आपल्या देशात जवळजवळ ८०० दशलक्ष इंटरनेट वापरकर्ते आहेत त्याच्या जोडीला अजून ४०० दशलक्ष वापरकर्ते वाढवण्याचे आव्हान आपल्या आपल्यासमोर आहे जागतिक बाजारपेठेत मोठ्या संध्यानची उपलब्धता आहे त्यासाठी अर्थपूर्ण ब्रॉडबॅन्ड सेवा देणाऱ्या नेटवर्कची बांधणी करून संपूर्ण प्रशासनातील व्यवहार सर्वांसाठी खुले करून यामध्ये सहभागी होणे सुलभ आणि सुरक्षित आणि विश्वासदायक तसेच जबाबदार या ध्येयावर केंद्रित असले पाहिजे या साधनाचा वापर करून भारताला झपाट्याने वाढणारी अर्थव्यवस्था म्हणून ओळख निर्माण करणे त्यासाठी अत्यावश्यक नवकल्पना निर्माण करून देशातील डिजिटल असमानता दूर करून पायाभूत सुविधा वाढवण्यावर भर द्यावा लागेल जेणे करून सर्वांना या सुविधेचा लाभ घेता येईल कोणी ही या पासून वंचित राहणार नाही

**ई प्रशासनाचे फायदे :**

समाजातील दुर्लक्षित व वंचित घटकांच्या विकासाच्या योजना सरकारने हाती घेतल्या त्या योजना मध्ये संजय गांधी निराधार योजना अपंग निवृत्ती योजना ,श्रवणबाळ योजना ,इंधीरा गांधी राष्ट्रीय वृद्धापकाळ अशा विविध योजन राबवून दरमहा लभार्थीला रोख रक्कम देण्यात येते या योजनांच्या सुलभ वितरण होण्यासाठी ई प्रशासनाचा अगदी योग्य वापर करून ई माध्यमाचा वापर बँकांच्या सहाय्याने करून बायोमॅट्रिक करून आधार नंबर जोडून त्यांना मिनी एटीएमदेण्यात आले त्यांच्या बोटाच्या ठसे व आधार नंबर तसेच रेशनकार्ड जोडणीमुळे संगणकाच्या स्क्रीन वर सगळे डिटेल येते त्याची नोंद करून ठेवली जाते यामुळे लभार्थीला याचा फायदा होऊन अनुदानाची रक्कम त्वरित मिळते या तंत्रज्ञानामुळे प्रशासनात पारदर्शकता ,अचूकता स्पष्टता ,सुलभता व कामात जलदगती प्राप्त होते

**ई-प्रशासना तर्फे यशस्वी झालेली राज्ये आणि त्यांच्या योजना**

देशातील विवध राज्यात ई प्रशासनाच्या माध्यमातून शासकीय योजनांच्या आमलबजवणीत सुलभता निर्माण झाली खऱ्या अर्थाने जे लाभार्थी आहेत त्यांना या योजनेचा लाभ मिळतो भारताच्या विविध राज्यात या माध्यमातून उल्लेखनीय कामगिरी केली आहे या मध्ये त्रिपुरा राज्यात वृद्ध पेन्शन योजना ,झारखंडची रोजगार हमी योजना ,आंध्र प्रदेशाची स्वस्त धान्य योजना ,कर्नाटकची एलपीजी कॅश ट्रान्सफॉर्म योजना ,महाराष्ट्र राज्यात विद्यार्थी स्कॉलरशिप व शेतकरी कर्ज मुक्ती योजना अत्यंत सक्षम पणे राबवल्या गेल्या यामुळे प्रशासनातील दलाली आणि बोगस पणा याला चाप बसला शासनाचा पैसा आणि वेळेची बचत झाली

आजच्या घडीला देशातील सर्वसामान्य जनतेला जागतिक दर्जाच्या सेवा उपलब्ध करून देण्यासाठी शासनाच्या क्षमता वाढवण्यासाठी सदोष प्रशासन व्यवस्थेतील दोष दूर करून ,भक्कम आर्थिक व्यवस्था निर्माण करणे ,नियमांची अतिरेकी अंमल दूर

करणे ,राज्यकर्त्यांचा हस्तक्षेप दूर करणे ,नोकरशाहीची मनमानी कमी करून नागरिकांच्या हिताच्या दृष्टीने काम होणे सुलभ होण्यासाठी ई प्रशासनाला पर्याय असू शकत नाही .

आज ई प्रशासन माध्यमामुळे प्रत्येक शासकीय योजना ,उपक्रम ,कार्यक्रम यांची माहिती नागरिकांना ऑनलाइन प्राप्त होते या शिवाय एम-प्रशासनतंत्रावर आधारित अनुदान ,सबसिडी ,परवाण्याचे नूतनीकरण ,बँक खात्यातील रक्कम ,विजबिल ,दूरध्वनी बिल ,एल आय सी हप्ता ,कर्जाचे हप्ते ,दाखले विविध प्रमाणपत्रे इत्यादि बाबत अचूक माहिती घरबसल्या मोबाइल संदेश द्वारे मिळते त्यामुळे आजच्या डिजिटल युगात शासन आपल्या दारी नव्हे तर प्रशासन आपल्या दारीच्या सुविधा आपल्याला मिळत आहेत .

**ई प्रशासनातील उणिवा :**

याचे बरेच फायदे असले तरी त्याचे तोटे देखील असतात प्रत्येक नाण्याला दोन बाजू असतात त्याच प्रमाणे याला ही एक दुसरी बाजू आहे

१ **डिजिटल निरक्षरता** : जरी आपला देश विकसनशील असला तरी इथल्या बऱ्याच पैकी जनतेला इलेक्ट्रिक साधनाचा वापर करण्या विषयी आवश्यक असणारे ज्ञान नाही यामुळे या सुविधेचा लाभ मिळवण्यात अडचणी येवू शकतात .

२ **इंटरनेट सुलभतेचा अभाव** :इंटरनेट सुविधेचा प्रसार देशातील दुर्गम भागापर्यंत झाला नाही त्यामुळे याच्या वापराच्या अडचणी निर्माण होतात

३ **मानवी संवादाचा अभाव** :सामान्य जनतेला त्याच्या दैनदीन कामात येणाऱ्या समस्या त्याचे निवारण करण्यासाठी योग्य व्यसपीठ उपलब्ध होत नाही त्यामुळे बरेच प्रश्न निर्माण होतात .

४ **डेटा चोरीचा धोका** :हल्ली सायबर गुंडगिरी दीवसेंदिवस वाढत चालली आहे त्याला प्रतिबंध घालण्याची पर्यायी व्यवस्था अजून तर उपलब्ध नाही तसेच तांत्रिक समस्येचा बहाणा सांगून कामाची टाळाटाळ केली जाते लोकांच्या समस्याकडे सोयीस्कर रित्या दुर्लक्ष केले जाते .

ई प्रशासनाची गरज का आहे

नागरिक व्यवसायिक ,व शासनातील विविध विभाग यांच्या मध्ये माहितीची देवाणघेवाण करण्यासाठी आयसीटी चा वापर करण्यासाठी, सार्वजनिक सेवा अधिक जलद गतीने व परिणामकरीत्या पोहचवण्यासाठी ,प्रशासकीय प्रक्रियांची पुनर्रचना करण्यासाठी ,प्रशासकीय सेवांचा दर्जा वाढवण्यासाठी ई प्रशासना धोरण राबवणे गरजेचे आहे .

**संदर्भ सूची**

१ सुप्रशासन ,डॉ . भालेराव . जे . के ,एज्यूकेशनल पब्लिशर्स अँड डिस्ट्रिब्युटर पान नं १३ ,१४ ,१५ ,१६

२ ई प्रशासन ,डॉ अरविंद कुलकर्णी ,स्वयंदिप प्रकाशन ,पान नं ९ ,१० ,११ ,

३ housing. Com

४ https:/wwwmarathi.indiatimes.com वाटचाल ई लोकशाहीकडे

५ https:/pib.gov.inइंटरनेट प्रशासनावरील पथदर्शी आराखडा निश्चित करण्याच्या दिशेन भारत

६ vikaspedia

७ https : // mahendrapatil1210 blogspot. com

८ national portal of india https: //www india gov . in

९ https .// ncert .nic.i

१० https : //www इंडिया.सरकार.भारत